ePaper


## “आमची संख्या आणखी वाढणार”; 59 आमदार फोडल्यानंतर ऋतब्रता बॅनर्जींचा दावा

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 06 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





पान 3 वरुन...

बंदी फक्त कागदावर; शहर प्लास्टिकच्या विळख्यात

## भारत-रशिया मैत्रीवर पुतीन यांचे पश्चात्य देशांना खडे बोल

# मोदींवर दबाव आंतरराष्ट्रीय संबंधांस घातक



**महाईन्यूज । मुंबई**

**रशिया आणि भारतातील ऐतिहासिक मैत्री अधिक दृढ होत असून भारताला रशियापासून दूर करण्याचे पाश्चात्त्य देशांचे प्रयत्न पूर्णपणे निष्फळ ठरतील, असे स्पष्ट मत रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी व्यक्त केले. भारतावर दबाव आणणे जागतिक स्थिरता आणि आंतरराष्ट्रीय संबंधांसाठी घातक ठरू शकते, असा इशाराही त्यांनी दिला.**

सेंट पीटर्सबर्ग येथे भारतीय वृत्तसंस्थेसह विविध आंतरराष्ट्रीय माध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधताना पुतीन यांनी भारताच्या स्वतंत्र परराष्ट्र धोरणाचे आणि आर्थिक प्रगतीचे कौतुक केले. भारत आज जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक असून वेगाने विकास करत असल्याचे त्यांनी नमूद केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचा गौरव करताना पुतीन म्हणाले की, भारताची आर्थिक झेप ही सरकारच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित आहे. आगामी काळात भारत-रशिया द्विपक्षीय व्यापार शंभर अब्ज डॉलर्सचा टप्पा पार करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

अमेरिकेसोबत वाढणाऱ्या भारताच्या संबंधांमुळे भारत-रशिया मैत्रीवर कोणताही परिणाम होणार नाही, असे स्पष्ट करत पुतीन म्हणाले की, भारत हा एक महान लोकशाही देश असून स्वतःचे राष्ट्रीय हित ओळखून विविध देशांशी संबंध प्रस्थापित करतो. रशिया भारताला विश्वासू भागीदार मानतो आणि भारताच्या स्वतंत्र निर्णयांचा आदर करतो.

रशियासोबतचे संबंध कमी करण्यासाठी पाश्चात्त्य देशांकडून भारतावर दबाव आणण्याचे प्रयत्न झाले असल्याचे मान्य करताना पुतीन यांनी अशा प्रयत्नांवर टीका केली. भारतासोबतचे आर्थिक, व्यापारी आणि धोरणात्मक संबंध भविष्यात आणखी मजबूत करण्यासाठी रशिया कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



### भारत स्वतःचे हित ओळखणारा ‘विश्वासू मित्र’

अमेरिकेसोबत वाढणाऱ्या भारताच्या जवळकीमुळे रशिया आणि भारताच्या संबंधांवर काही परिणाम होईल का? असा प्रश्न पुतीन यांना विचारण्यात आला होता. यावर उत्तर देताना त्यांनी स्पष्ट केले की, भारताचे अमेरिकेसोबतचे संबंध हे रशियासोबतच्या मैत्रीत कोणताही अडथळा आणू शकत नाहीत. “भारत हा एक महान देश आणि मोठी लोकशाही आहे. रशिया भारताला आपला एक अत्यंत विश्वासू भागीदार मानतो. भारत आपल्या राष्ट्रीय हितासाठी ज्या देशांशी संबंध ठेवणे गरजेचे समजतो, त्या सर्व देशांशी तो आपले संबंध वाढवत आहे आणि याचा आम्हाला आनंदच आहे,” असे पुतीन म्हणाले.

### पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाचे कौतुक

भारताच्या वेगवान आर्थिक विकासाचा उल्लेख करत राष्ट्राध्यक्ष पुतीन म्हणाले, “भारत सध्या जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक आहे आणि देश अत्यंत प्रभावी दराने प्रगती करत आहे. ही प्रगती अशीच अचानक झालेली नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत सरकारने केलेल्या कठोर परिश्रमांचा हा थेट परिणाम आहे.” आगामी काळात रशिया आणि भारत यांच्यातील द्विपक्षीय व्यापार १०० अब्ज डॉलर्सचा टप्पा पार करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### पाश्चात्त्य देशांचे प्रयत्न अपयशी

रशियासोबतचे संबंध तोडण्यासाठी पाश्चात्त्य देशांकडून भारतावर सातत्याने दबाव आणण्याचे प्रयत्न झाले आहेत, हे पुतीन यांनी मान्य केले. मात्र, “पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतावर दबाव आणणे आंतरराष्ट्रीय संबंधांसाठी किती नुकसानकारक ठरू शकते, हे आता सर्वांनाच समजले आहे,” असे म्हणत त्यांनी पाश्चात्त्य देशांना थेट इशारा दिला. भारताच्या इतर देशांसोबत असलेल्या संबंधांमुळे रशियावर कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही, उलट रशिया भारतासोबतचे आर्थिक आणि व्यापारी संबंध अधिक मजबूत करत राहील, असा निर्धार पुतीन यांनी शेवटी व्यक्त केला.



# महापालिकेत अधिकाऱ्यांची बैठकीला दांडी!

## प्रशासनाचा निषेध करत स्थायी समितीची बैठक तहकूब!

**महाईन्यूज । पुणे**

**महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीला अतिरिक्त आयुक्तांसह काही विभागप्रमुखांनी दांडी मारल्याने करण्यात आली. महापालिका आयुक्त नवल किशोर राम हे अनुपस्थित राहणार असल्याने त्यांनी इतर अधिकाऱ्यांना बैठकीला हजर राहण्याचे आदेश दिले होते. मात्र, याकडे दुर्लक्ष करून अधिकारी गैरहजर राहिल्याचा आरोप स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी केला.**



महापालिकेची स्थायी समितीची बैठक प्रत्येक आठवड्यात होते. महापालिकेच्या तिजोरीच्या चाव्या हातात असलेल्या स्थायी समितीच्या बैठकीसाठी महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह सर्व विभागप्रमुख उपस्थित राहतात. या बैठकीत शहरातील विविध कामांच्या व प्रकल्पांच्या निविदा मंजूर करण्यासह विविध विषयांवर चर्चा होते. सध्या विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था प्रतिनिधी निवडणुकीची आचारसंहिता लागू आहे. त्यामुळे स्थायी समितीच्या बैठकीत केवळ चर्चा होते. कोणताही निर्णय घेता येत नाही.

आचारसंहिता असल्याने कोणतेही महत्त्वाचे निर्णय घेता येत नाही. शहरात पुढच्या महिन्यात पालखीचे आगमन होणार आहे तसेच पावसाळापूर्वक कामांची घाईगडबड सुरू आहे. नालेसफाई, ड्रेनेज लाईन, तसेच पावसाळी गटारांची स्वच्छता अशी कामे रखडली आहेत. त्यामुळे आचारसंहितेमधून दिलासा द्यावा, अशी मागणी काही दिवसांपूर्वी महापालिका प्रशासनाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे केली होती. मात्र महापालिका प्रशासन बैठक घेऊ शकते मात्र कोणताही निर्णय घेऊ शकत नाही असे पत्र जिल्हाधिकारी कार्यालयाने महापालिकेला पाठवले होते.

शहरात प्रलंबित असलेल्या प्रश्नांबाबत चर्चा करण्यासाठी महापालिकेच्या स्थायी समितीची बैठक समितीचे अध्यक्ष भिमाले यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. महापालिका आयुक्त कामानिमित्त शहराच्या बाहेर असल्याने ते बैठकीला उपस्थित राहणार नव्हते. त्यामुळे त्यांनी महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांसह विभागप्रमुखांना बैठकीला हजर राहण्याच्या सूचना केल्या होत्या. मात्र, या बैठकीला एकही अतिरिक्त आयुक्त उपस्थित न राहिल्याने तसेच काही विभागप्रमुखांनीदेखील या बैठकीकडे पाठ फिरविली.

स्थायी समितीने बैठक बोलू नये अनेक विभागांचे प्रमुख या बैठकीसाठी अनुपस्थित राहिल्याने महापालिकेतील सभासदांमध्ये नाराजी पसरली. सभेचे अध्यक्ष असलेल्या श्रीनाथ भिमाले यांच्याकडे सदस्यांनी ही नाराजी बोलून दाखवली. महत्त्वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठी बैठक बोलावलेली असतानाही अधिकारी जर का गैरहजर राहत असतील तर शहरातील समस्या कशा सुटणार? अशी चर्चा या बैठकीत झाली.

### स्थायी समितीने व्यक्त केला निषेध

महापालिका आयुक्त मुंबईला गेल्याने या बैठकीला अतिरिक्त आयुक्त व विभाग प्रमुखांनी उपस्थित राहणे आवश्यक होते. मात्र, या बैठकीला तीनही अतिरिक्त आयुक्त गैरहजर राहिले. अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे कार्यालयात हजर असूनही बैठकीसाठी आले नाहीत. त्यामुळे प्रशासनाचा निषेध करत स्थायी समिती तहकूब करण्यात आल्याचे भिमाले यांनी सांगितले.

# वसंत मोरे यांचा शरद पवारांच्या राष्ट्रवादीवर गंभीर आरोप

**महाईन्यूज । पुणे**

**गेल्या काही दिवसांपासून स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघाच्या विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आलेला आहे. पुण्यात महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून श्रीकांत पाटील यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र, श्रीकांत पाटील यांनी उमेदवारी माघारी घेतल्याने पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे उमेदवार विक्रम काकडे हे बिनविरोध निवडून आले.**



### 'दोन्ही राष्ट्रवादी एकच...'

दोन्ही राष्ट्रवादी एकच आहेत असं तुम्हाला वाटतं का? या प्रश्नावर बोलताना वसंत मोरे म्हणाले की, "छापा आणि काटा म्हणजे एकाच नाण्याच्या दोन बाजू असू शकतात असं म्हणायला वाव आहे. कारण राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने दोन ठिकाणी माघार घेतली आहे. त्यामुळे एका बाजूला महायुतीला मदत झाली, एका ठिकाणी शिंदेंच्या शिवसेनेला मदत झाली. याचा अर्थ महायुतीचे दोन आमदार फक्त राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाने विधानपरिषदेच्या निवडणुकीतून माघार घेतल्यामुळे आमदार झाले आहेत", असंही वसंत मोरे यांनी म्हटलं आहे.

त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या या भूमिकेवरून पुण्यात महाविकास आघाडीत बिघाडीची चर्चा रंगली आहे. यावरूनच काँग्रेसचे नेते प्रशांत जगताप यांनी देखील टीका करत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने आमचा विश्वासघात केल्याचा आरोप केला होता. त्यानंतर आता शिवसेना ठाकरे गटाचे नेते वसंत मोरे यांनीही राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षावर नाराजी व्यक्त केली. "दोन्ही राष्ट्रवादीच्या भाऊबंदकीचा आम्हाला त्रास होतोय", असं म्हणत 'विधानपरिषदेच्या निवडणुकीत घोडेबाजार नाही, तर १०० टक्के सेटलमेंट झाली', असा गंभीर आरोप वसंत मोरे यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीवर केला आहे.

"महाविकास आघाडीत हा विश्वासघात आहे. कारण जेव्हा विधानपरिषदेचे अर्ज दाखल करायचे होते, तेव्हा पुण्याची जागा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने घेतली. मात्र, ही जागा घेताना पक्ष म्हणून घेतली नाही, तर महाविकास आघाडी म्हणून घेतली होती. मग असं असताना महाविकास आघाडी म्हणून जर तुम्ही पुण्याची जागा तुमच्या पक्षाला घेत असाल तर उमेदवारी कोणाला दिली? हे तुम्ही उशीरा का जाहीर केलं? उमेदवारी माघारी घेताना देखील महाविकास आघाडीत कोणाला सांगितलं नाही? मग तुमचा हाच महाविकास आघाडीचा धर्म आहे का?", असा सवाल वसंत मोरे यांनी केला आहे.

"या सगळ्या विषयांमध्ये घोडेबाजार झाला आहे का? तर झाला असेल. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने ठाण्यात आणि पुण्यातही माघार घेतली. पुण्यात महायुतीचे विक्रम काकडे बिनविरोध निवडून आले. आता फक्त साताऱ्याची जागा राहिली. जर साताऱ्यात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचा उमेदवार निवडून आला, तर याला सेटलमेंट म्हणायचं नाही तर काय? कारण राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्ष ठाण्यात शिंदेंच्या सेनेला मदत करत असेल तर साताऱ्यात शिंदेंची सेना यांना मदत का नाही करणार?", असंही वसंत मोरे यांनी म्हटलं आहे.

"शरद पवार हे त्यांची खेळी करत आहेत असं १०० टक्के असू शकतं. यामध्ये नाही म्हणायला कुठेही वाव नाही. आम्ही देखील हीच गणितं महापालिकेच्या राजकारणात याआधी अनुभवलेली आहेत. महापालिकेच्या निवडणुकीत मी देखील स्वत: हे अनुभवलं आहे. मी तेव्हा देखील सांगितलं होतं की यांच्याबरोबर (राष्ट्रवादी शरद पवार पक्ष) आघाडी नको. कारण जर हे भाऊबंदकी करणार असतील, याआधी महापालिकेच्या निवडणुकीवेळी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्या होत्या, तेव्हाही यांची भाऊबंदकी पाहायला मिळाली होती. आता विधानपरिषदेच्या निवडणुकीतही हे भाऊबंदकी करणार असतील तर आता यांच्या भाऊबंदकीचा आम्हाला त्रास होतोय", असं म्हणत वसंत मोरे यांनी जोरदार टीका केली.

# बंदी फक्त कागदावर; शहर प्लास्टिकच्या विळख्यात

## छापेमारी आणि दंडाची दिखाऊ कारवाई; सिंगल युज प्लास्टिकमुळे तुंबले नाले

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**एकीकडे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण संवर्धनाचे संदेश दिले जात आहेत. वृक्षारोपण, स्वच्छता आणि जनजागृतीचे कार्यक्रम होत आहेत. मात्र दुसरीकडे पिंपरी-चिंचवड शहरात प्रतिबंधित प्लॅस्टिकचा वापर बिनधास्तपणे सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. रस्ते, नाले, कचराकुंड्या आणि मोकळ्या जागांमध्ये प्लॅस्टिकचा वाढता कचरा पर्यावरणासमोर मोठे आव्हान निर्माण करत आहे.**

महापालिकेकडून प्लॅस्टिक बंदीबाबत वारंवार सूचना आणि कारवाईचे दावे केले जातात. मात्र प्रत्यक्षात शहरातील अनेक बाजारपेठा, फेरीवाले, भाजी विक्रेते आणि किरकोळ व्यावसायिकांकडे आजही सर्रास प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर होताना दिसत आहे. त्यामुळे प्लॅस्टिक बंदीची अंमलबजावणी केवळ कागदावरच असल्याची टीका नागरिकांकडून होत आहे. सध्या शहरात पावसाळ्यापूर्वी नालेसफाईची कामे सुरू आहेत.

या सफाई मोहिमेदरम्यान नाल्यांमधून मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिक कचरा बाहेर येत आहे. अनेक ठिकाणी प्लॅस्टिकमुळे नाले तुंबल्याचे चित्र दिसून येत आहे. यामुळे पावसाळ्यात पाणी साचण्याचा आणि पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका वाढला आहे. पर्यावरण तज्ज्ञांच्या मते, सिंगल युज प्लॅस्टिक हे शहरातील प्रदूषणाचे प्रमुख कारण बनले आहे. प्लॅस्टिक सहज नष्ट होत नाही. त्यामुळे ते वर्षानुवर्षे पर्यावरणात कायम राहते.



जमिनीची सुपीकता कमी होते.

नाले आणि जलवाहिन्यांमध्ये अडथळे निर्माण होतात. तसेच पाणी आणि मातीचे प्रदूषण वाढते. शहरातील रस्त्यांवर टाकण्यात येणाऱ्या प्लॅस्टिक पिशव्यांमुळे मुक्या जनावरांनाही मोठा फटका बसत आहे. अन्नाच्या शोधात भटकणारी जनावरे प्लॅस्टिकसह कचरा खातात. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. अनेकदा अशा घटनांमुळे जनावरांचा मृत्यूही होत असल्याचे पशुप्रेमी सांगतात. महापालिकेच्या कारवाईत सातत्य नसल्याची खंत नागरिक व्यक्त करत आहेत.

एखाद्या दिवशी छापेमारी होते. दंड आकारला जातो. काही दिवस प्लॅस्टिकचा वापर कमी होतो. मात्र त्यानंतर पुन्हा परिस्थिती पूर्ववत होते. त्यामुळे किरकोळ विक्रेत्यांऐवजी प्लॅस्टिक उत्पादक आणि घाऊक पुरवठादारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. जागतिक पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणप्रेमींनी प्रशासन आणि नागरिक दोघांनाही आत्मपरीक्षण करण्याचे आवाहन केले आहे. प्लॅस्टिकमुक्त शहराचा संकल्प केवळ भाषणांपुरता न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याची गरज व्यक्त होत आहे.

### प्लास्टिकचा विळखा वाढतोय!

पिंपरी-चिंचवडमध्ये नालेसफाईदरम्यान मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कचरा आढळून येत आहे. प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर अद्यापही सर्रास सुरू असल्याने नाले तुंबणे, पाणी साचणे आणि पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका वाढला आहे. पर्यावरणासह मुक्या जनावरांच्या आरोग्यावरही याचे गंभीर परिणाम होत असून, प्लास्टिक उत्पादक व पुरवठादारांवर कठोर कारवाईची मागणी जोर धरत आहे.

# धोक्याची घंटा! पवना धरणातील जलसाठा 23 टक्क्यांवर

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मावळ तालुक्यातील पवना धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने घट होत असून गुरुवारी रात्रीपर्यंत धरणात केवळ 23 टक्के पाणी शिल्लक राहिले आहे. वाढत्या उष्णतेमुळे मोठ्या प्रमाणात बाष्पीभवन होत असल्याने धरणाचे पात्र कोरडे पडू लागले असून अनेक ठिकाणी दगड, माती आणि गाळ उघडा पडला आहे. पाऊस लांबणीवर पडल्यास शहरास पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो.**

पिंपरी-चिंचवड महापालिकेसह परिसरातील नगरपालिका, ग्रामपंचायती आणि औद्योगिक वसाहतींना वर्षभर पवना धरणातून पाणीपुरवठा केला जातो. महापालिकेकडून दररोज सुमारे 550 एमएलडी पाणी उपसा करून निगडी-प्राधिकरण येथील जलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया केल्यानंतर शहराला वितरित केले जाते. याशिवाय आंद्रा पाणी योजनेतून दररोज 90 एमएलडी पाणी चिखली जलशुद्धीकरण केंद्राकडे पाठविले जाते.

धरणातील पाणीसाठा कमी झाल्याने पात्रातील मोठा भाग उघडा पडला आहे. अनेक ठिकाणी शेतकरी गाळ काढून नेत असल्याचे चित्र दिसत आहे. अधिकाऱ्यांच्या मते, सध्याचा पाणीसाठा जूनअखेरपर्यंत पुरेल. मात्र, मान्सून उशिरा दाखल झाल्यास परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### पाणीसाठ्याची सद्यस्थिती...

पिंपरी-चिंचवड शहराच्या पाणीपुरवठ्याचा मुख्य आधार असलेल्या पवना धरणात केवळ 23 टक्के जलसाठा शिल्लक आहे. तर आंद्रा धरणात 33 टक्के, भामा आसखेडमध्ये 31 टक्के आणि मुळशी धरणात 19 टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. मान्सून उशिरा दाखल झाल्यास उपलब्ध साठ्यावर ताण वाढून शहरास पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो.

दरम्यान, शहरासाठी महत्त्वाच्या अन्य जलस्रोतांमधील पाणीसाठाही कमी होत आहे. आंद्रा धरणात 33 टक्के, भामा आसखेड धरणात 31 टक्के, तर मुळशी धरणात केवळ 19 टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. भामा आसखेड पाणीपुरवठा प्रकल्प अद्याप पूर्णत्वास न गेल्याने शहराला अपेक्षित अतिरिक्त 167 एमएलडी पाणी मिळालेले नाही. त्यामुळे आगामी काही दिवसांत पावसाची प्रतीक्षा वाढली असून प्रशासनासह नागरिकांचे लक्ष धरणांतील जलसाठ्याकडे लागले आहे.




### जूनअखेरपर्यंतच दिलासा?

प्रचंड उष्णतेमुळे धरणांतील पाण्याचे बाष्पीभवन वेगाने होत असून पवना धरणाचे पात्री मोठ्या प्रमाणात उघडे पडले आहे. अधिकाऱ्यांच्या मते सध्याचा साठा जूनअखेरपर्यंत पुरेसा असला, तरी मान्सूनला विलंब झाल्यास पाणीपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता असून नागरिकांची चिंता वाढली आहे.



## भूमिका

**पश्चिम बंगालच्या राजकारणात दीर्घकाळ वर्चस्व गाजविणाऱ्या ममता बॅनर्जी आणि त्यांच्या तृणमूल काँग्रेस पक्षासमोर आज अभूतपूर्व आव्हान उभे ठाकले आहे. एकेकाळी डाव्या पक्षांच्या साडेतीन दशकांच्या सत्तेला आव्हान देत जनतेच्या बळावर सत्तेवर आलेल्या ममतादीदी आज स्वतः राजकीय संकटाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत.**

# पिंजऱ्यातील वाघीण आणि राजकीय वास्तव



विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर तृणमूल काँग्रेसमध्ये सुरू झालेली अस्वस्थता आता उघड बंडाच्या स्वरूपात समोर येत आहे.

निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने तृणमूल काँग्रेसचा पराभव करत सत्ता हस्तगत केली. या पराभवामुळे पक्षातील अनेक नेत्यांमध्ये नाराजी निर्माण झाली. विशेषतः पक्षातील निर्णय प्रक्रियेत अभिषेक बॅनर्जी यांचा वाढता प्रभाव आणि पक्षाची सूत्रे त्यांच्या हाती केंद्रीत झाल्याची भावना अनेक आमदारांमध्ये आहे. याच पार्श्वभूमीवर काही आमदारांनी पक्ष नेतृत्वाविरोधात आवाज उठविला असून, त्यातून पक्षातील अंतर्गत संघर्ष उघड झाला आहे. राजकारणात पराभव जितका महत्त्वाचा असतो, तितकीच त्यानंतरची प्रतिक्रिया महत्त्वाची असते. सत्तेत असताना तृणमूल काँग्रेसवर दहशत, हिंसाचार आणि विरोधकांवरील दबावाचे आरोप सातत्याने होत राहिले. जनतेच्या असंतोषाचा फायदा भाजपने घेतला आणि स्वतःला पर्याय म्हणून उभे केले. परिणामी बंगालमध्ये सत्तांतर घडले. मात्र सत्तेचा गमावलेला प्रभाव आणि पक्षातील वाढती नाराजी यामुळे तृणमूल काँग्रेस अधिकच अडचणीत सापडली आहे.

या घडामोडींची तुलना महाराष्ट्रातील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटींशी केली जात आहे. महाराष्ट्रात जसे नेतृत्वावरील आदर कायम ठेवत पक्षाच्या कार्यपद्धतीविरोधात बंड करण्यात आले, तसेच चित्र बंगालमध्येही दिसून येत आहे. बंडखोर नेते ममता बॅनर्जी यांच्याबद्दल आदर व्यक्त करीत असले तरी पक्षातील काही व्यक्तींच्या वाढत्या हस्तक्षेपावर त्यांची नाराजी आहे.

ममता बॅनर्जी यांचा राजकीय प्रवास संघर्षमय राहिला आहे. डाव्या पक्षांच्या सत्तेविरोधात रस्त्यावर उतरून लढणाऱ्या आणि अनेक संकटांचा सामना करणाऱ्या नेत्या म्हणून त्यांची ओळख आहे. त्यामुळे सध्याचे संकट त्यांच्यासाठी नवीन नाही. मात्र यावेळी परिस्थिती वेगळी आहे. विरोधकांचा दबाव, पक्षातील मतभेद आणि जनाधारातील घट या तिन्ही आघाड्यांवर त्यांना लढावे लागत आहे.

तृणमूल काँग्रेसचे भवितव्य आता ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वक्षमतेवर अवलंबून आहे. पक्षातील नाराजी दूर करून संघटना पुन्हा एकत्र बांधण्यात त्यांना यश आले तर पुनरागमनाची शक्यता नाकारता येणार नाही. परंतु अंतर्गत संघर्ष वाढत राहिला, तर पक्षाचे नुकसान आणखी वाढू शकते.

राजकारणात जखमी झालेला नेता अनेकदा अधिक ताकदीने परत येतो. ममता बॅनर्जी यांचा स्वभाव पाहता त्या सहज हार मानणाऱ्या नाहीत. त्यामुळे बंगालच्या राजकारणातील ही 'जखमी वाघीण' पुन्हा झेप घेईल की राजकीय पिंजऱ्यातच अडकून राहील, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

## प्रासंगिक »

### विश्वासाला तडा

**राम नावाच्या एका माणसाकडे अतिशय सुंदर व उमदा घोडा होता. तो घोड्याची प्रेमाने काळजी घेत असल्याने दोघांमध्ये जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले होते.**

एके दिवशी शाम नावाच्या घोड्याच्या व्यापाऱ्याने तो घोडा पाहिला आणि तो मिळवण्याचा कपटी डाव रचला. त्याने आजारी भिकाऱ्याचे सोंग घेत रामच्या वाटेवर बसून राहिला.

राम तेथून घोड्यावरून जात असताना शामने मदतीची याचना केली. त्याची अवस्था पाहून दयाळू रामने त्याला घोड्यावर बसवले आणि स्वतः पायी चालू लागला. मात्र संधी साधून शाम घोडा घेऊन पळून गेला व तो विकून टाकला. दुसऱ्या दिवशी तो रामसमोर येऊन आपल्या फसवणुकीची कबुली देऊ लागला. तेव्हा राम शांतपणे म्हणाला, "तू माझा घोडा घेतलास याचे मला दुःख नाही; पण ही गोष्ट कुणालाही सांगू नकोस. कारण लोकांचा गरजूंवरील विश्वास उडेल आणि खऱ्या गरजू माणसांनाही मदत मिळणार नाही."

**- तात्पर्य : विश्वासघात हा मोठा अपराध आहे. मदत करताना विवेक बाळगणे आवश्यक असते.**

तामिळनाडूचे राजकारण सध्या एका महत्त्वाच्या वळणावर उभे आहे. द्रविडी पक्षांचे दशकांपासूनचे वर्चस्व, नव्या नेतृत्वाचा उदय आणि प्रादेशिक अस्मितेचे पुनरुज्जीवन या घडामोडींमुळे राज्यातील राजकीय समीकरणे वेगाने बदलताना दिसत आहेत.

# अण्णामलाई यांची तमिळ अस्मितेची हाक



अशा परिस्थितीत के. अण्णामलाई यांनी भाजपपासून वेगळी वाट निवडण्याचा घेतलेला निर्णय विशेष लक्षवेधी ठरला आहे. अण्णामलाई हे तामिळनाडूमध्ये भाजपचा आक्रमक आणि लोकप्रिय चेहरा म्हणून उदयास आले होते. माजी आयपीएस अधिकारी म्हणून मिळालेली ओळख आणि प्रभावी वक्तृत्वाच्या बळावर त्यांनी पक्षाचा विस्तार करण्यासाठी मोठे प्रयत्न केले. मात्र, राष्ट्रीय पक्षाच्या चौकटीत राहून स्थानिक अस्मितेचे राजकारण करण्याच्या मर्यादा त्यांच्यासमोर उभ्या राहिल्या. तामिळनाडूमध्ये भाषा, संस्कृती आणि प्रादेशिक स्वाभिमान या मुद्द्यांना नेहमीच विशेष महत्त्व राहिले आहे. त्यामुळे राष्ट्रीय राजकारणापेक्षा स्थानिक भावना येथे अधिक प्रभावी ठरतात. दुसरीकडे, अभिनेता विजय यांच्या राजकीय उदयानंतर राज्याच्या राजकारणात नवी ऊर्जा निर्माण झाली आहे. जनसंपर्क, सामाजिक कार्य आणि तरुणांमधील लोकप्रियतेच्या जोरावर त्यांनी स्वतःची स्वतंत्र राजकीय ओळख निर्माण केली. यामुळे पारंपरिक द्रविडी राजकारणाला पर्याय शोधणाऱ्या मतदारांना नवा पर्याय उपलब्ध झाला आहे. अण्णामलाई यांनीही याच बदलत्या वातावरणाचा वेध घेत तमिळ अस्मितेला केंद्रस्थानी ठेवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. त्यांच्या विधानांमधून आणि नव्या राजकीय भूमिकेतून तामिळ जनतेच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा संदेश दिला जात आहे. हा दृष्टिकोन राज्यातील प्रादेशिक भावनांना प्रतिसाद देणारा असल्यामुळे त्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. तथापि, नव्या पक्षाची किंवा चळवळीची उभारणी करणे सोपे नाही. संघटनात्मक ताकद, आर्थिक साधने आणि व्यापक जनाधार निर्माण करणे ही मोठी आव्हाने असतील. भाजपसारख्या राष्ट्रीय पक्षाचा आधार सोडल्यानंतर अण्णामलाई यांना स्वतःचे स्वतंत्र राजकीय स्थान निर्माण करण्यासाठी कठोर परिश्रम घ्यावे लागतील.

आज तामिळनाडूचे राजकारण नव्या पर्वात प्रवेश करत आहे. विजय यांचे सुशासनावर आधारित राजकारण आणि अण्णामलाई यांची तमिळ अस्मितेची भूमिका यांमधून भविष्यात नवे राजकीय ध्रुव निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्यातील राजकारण केवळ सत्तास्पर्धेपुरते मर्यादित न राहता वैचारिक आणि प्रादेशिक मुद्द्यांभोवती केंद्रित होऊ शकते. अण्णामलाई यांचा निर्णय यशस्वी होईल की नाही, हे भविष्यात स्पष्ट होईल. मात्र, त्यांच्या पावलामुळे तामिळनाडूच्या राजकारणात नव्या चर्चांना आणि नव्या समीकरणांना सुरुवात झाली आहे, हे निश्चित.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥

नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# गुंतवणूकदारांसाठी इन्व्हेस्ट महाराष्ट्रची स्थापना

## उद्योग विभागावर थेट मुख्यमंत्र्यांचा कब्जा! ३ हजार कोटींचा निधी...

**महाईन्यूज । मुंबई**

**येत्या चार वर्षात म्हणजेच सन २०३० पर्यंत एक लाख कोटी डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी राज्यात अधिकाधिक गुंतवणुकदारांना आकर्षित करण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र गुंतवणूक प्रोत्साहन संस्था-इन्व्हेस्ट महाराष्ट्र ची स्थापना करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून या संस्थेला तब्बल ३ हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.**



### मुख्यमंत्री अध्यक्ष

या संस्थेच्या प्रशासकीय परिषदेच्या अध्यक्षपदी मुख्यमंत्री, सह अध्यक्षपदी दोन्ही उपमुख्यमंत्री तर उपाध्यक्षपदी उद्योगमंत्री आणि सदस्य सचिवदी उद्योग विभागाचे प्रधान सचिव असतील.तर संचालक मंडळातही मुख्यमंत्री अध्यक्ष तर उद्योगमंत्री उपाध्यक्ष असतील.

भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी मोठी अर्थव्यवस्था असून, विश्वासार्ह जागतिक भागीदार म्हणून उदयास आला आहे. तसेच, नवोन्मेष, उत्पादन क्षेत्र आणि शाश्वत विकासाला चालना देणारा देश म्हणूनही भारताची ओळख निर्माण झाली आहे. देशाच्या या वाटचालीची आर्थिक शक्ती म्हणून महाराष्ट्राकडे पाहिले जात आहे.

राज्याचा राष्ट्रीय सकल देशांतर्गत उत्पादनात (GDP) सुमारे ५१ लाख कोटी रुपयांचा वाटा आहे, तसेच देशाच्या औद्योगिक उत्पादनात १५.४टक्के पेक्षा अधिक योगदान आहे. राज्याने परकीय थेट गुंतवणूक ((FDI)) आकर्षित करण्यात सातत्याने देशात आघाडी राखली असून, गेल्या दशकात देशातील एकूण एफडीआय पैकी ३१टक्के पेक्षा अधिक वाटा महाराष्ट्राचा राहिला आहे.

विशाल आर्थिक क्षमता, प्रगत धोरणात्मक चौकट, सक्षम गुंतवणूकदार वर्ग, धोरणात्मक भौगोलिक स्थान आणि जागतिक दर्जाची औद्योगिक पायाभूत सुविधा यांच्या बळावर महाराष्ट्र देशातील सर्वात सक्षम आणि स्पर्धात्मक औद्योगिक परिसंस्थांपैकी एक म्हणून उदयास आला आहे. राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर, संभाजीनगर आणि नाशिक ही प्रमुख शहरे वित्तीय सेवा, आयटी/आयटीईएस, लॉजिस्टिक्स, विद्युत वाहने , स्वच्छ ऊर्जा आणि प्रगत उत्पादन क्षेत्रांची प्रमुख केंद्रे म्हणून सातत्याने विकसित होत असून, अनेक उदयोन्मुख क्षेत्रे व प्रदेश पुढील काळात विकासाच्या नव्या संधी निर्माण करीत आहेत.

तामिळनाडू, कर्नाटक, गुजरात, उत्तर प्रदेश, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि राजस्थान यांसारख्या राज्यांनी त्यांच्या औद्योगिक क्षमतेच्या पलीकडे जाऊन गुंतवणूक प्रोत्साहन संस्था, तसेच जागतिक गुंतवणूकदार सुविधा केंद्रे स्थापन केली आहेत, यातून गुंतवणूक आकर्षित करणे आणि जागतिक स्तरावर संपर्क वाढविणे त्यांना शक्य होत आहे. याच धर्तीवर थेट परदेशी गुंतवणुकीतील आपले अव्वल स्थान टिकवून ठेवण्यासाठी आणि सन २०३० पर्यंत लाख कोटी अमेरिकन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी महाराष्ट्र गुंतवणूक प्रोत्साहन संस्था-इन्व्हेस्ट महाराष्ट्र (MAHARASHTRA INVESTMENT PROMOTION AGENCY INVEST MAHARASHTRA)ची स्थापना करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

इन्व्हेस्ट महाराष्ट्र संस्था गुंतवणूक आकर्षण व सुलभीकरणासाठी तसेच गुंतवणूक प्रोत्साहन व आकर्षणावर लक्ष केंद्रित करणार आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ((MIDC)), राज्य गुंतवणूक, व्यापार व गुंतवणूक सुलभीकरण कक्ष (MAITRI), उद्योग संचालनालय (DIRECTORATE OF INDUSTRIES), महाराष्ट्र इंडस्ट्रियल टाउनशिप लिमिटेड( MITL) तसेच राज्यातील इतर संबंधित संस्थांबरोबर समन्वय साधून जागतिक व देशांतर्गत गुंतवणूकदारांच्या सर्वांगीण गरजा पूर्ण करण्यासाठी कार्य करेल. ही सेवा अर्थव्यवस्थेतील प्राथमिक, दुय्यम आणि तृतीयक अशा सर्व क्षेत्रांतील गुंतवणूकदारांसाठी उपलब्ध असेल. या संस्थेसाठी ३ हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

# महाविकास आघाडीमध्ये बिघाडी; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची टीका

**महाईन्यूज । ठाणे**

**महाविकास आघाडीमध्ये बिघाडी झाली आहे. या निवडणुकीतही त्यांच्यामध्ये गटबाजी, मतभेद समोर आले. त्यांच्या उमेदवारांनी अनेक ठिकाणी माघार घेतली. तर महायुती मजबूतीने यशाची वाटचाल करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी सातत्याने महाराष्ट्राला पाठबळ देण्याचे काम करत आहे असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.**









ठाणे -पालघर स्थानिक प्राधिकारी निवडणुकीत शिंदे गटाचे उमेदवार रविंद्र फाटक बिनविरोध निवडून आल्यानंतर शुक्रवारी टेंभीनाका येथील आनंद आश्रमात जल्लोष करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. त्यानंतर शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधला.

दिवंगत वसंत डावखरे यांना बिनविरोध निवडून देण्याचे काम आम्ही केले होते. या निवडणुकीत शिवसेनेचे दोन,राष्ट्रवादी काँग्रेस दोन आणि भाजपचे दोन असे सहा बिनविरोध उमेदवार निवडून आले आहेत. ही पुढच्या विजयाची नांदी असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

महायुतीचे सरकार निवडून आले तेव्हापासून या राज्यात विकासाची घोडदौड सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे महाराष्ट्राला पाठबळ देत आहेत. शेतकऱ्यांच्या कर्ज माफीचा आम्ही निर्णय घेतला, विविध विकास प्रकल्पांना गती देण्याचे काम महायुती सरकार करत आहे असे शिंदे म्हणाले. नाशिक आणि जळगाव दोन्ही मतदारसंघात चर्चा सुरू असून महायुती मजबुतीने पुढे जात आहे १७ जागा निवडून आणू असा विश्वासही शिंदे यांनी व्यक्त केला.

ठाणे शहराचा समूह विकास योजनेच्या (क्लस्टर) माध्यमातून नियोजनबद्ध विकास होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सर्व मंत्र्यांना जबाबदारी दिली असून त्याचा लेखाजोखा मी घेत असतो. प्रत्येक मंत्र्याने त्यांच्या मतदारसंघात काम केली पाहिजे आणि आपल्या खात्याला न्याय दिला पाहिजे, असेही ते म्हणाले.

# तमिळनाडूत नव्या पक्षाची होणार एंट्री!

## भाजपातून बाहेर पडलेल्या के. अन्नामलाईची मोठी घोषणा, राजकीय समीकरणं बदलणार?

**महाईन्यूज । तामिळनाडू**

**भाजपाचे तमिळनाडूतील धडाडीचे नेते आणि माजी आयपीएस अधिकारी के. अन्नामलाई यांनी अखेर पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी त्यांचा हा राजीनामा स्वीकारला आहे. भाजपाने तमिळनाडू माजी प्रदेशाध्यक्ष के. अन्नमलाई यांनी पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा दिलेला राजीनामा मंजूर करण्या आल्याचे अधिकृत पत्रक जारी करण्यात आले आहे.**



राजीनामा देण्यापूर्वी मंगळवारी दिल्लीत अन्नामलाई यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपा अध्यक्ष नितीन नवीन यांची भेट घेतली होती. भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने त्यांना आपल्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची विनंती केली होती. अगदी ते दिल्ली विमानतळाकडे निघाले असतानाही त्यांना पुन्हा चर्चेसाठी बोलावण्यात आले होते. मात्र, अन्नामलाई आपल्या निर्णयावर ठाम राहिले. पक्षातील सूत्रांनुसार, हा दौरा केवळ पक्ष नेतृत्वाचे आभार मानण्यासाठी होता.

अण्णामलाई यांनी दिलेल्या राजीनामापत्रात पक्ष सोडण्यामागील भूमिका मांडली आहे. “पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून प्रेरणा घेऊन सहा वर्षांपूर्वी, तमिळनाडूच्या राजकारणात बदल करण्याच्या उद्देशाने आणि त्यात सकारात्मक बदल घडविण्यासाठी मी भाजपात प्रवेश केला. राजकारण उच्चभ्रू आणि ठराविक लोकांसाठी असून, सामान्य नागरिकांसाठी नाही हा समज दूर करायचा होता”, यासाठी पक्षाने माझ्या विश्वास ठेवल्याबाबत अण्णामलाई यांनी भाजपा नेतृत्वाचे आभार मानले.

“राष्ट्रीय पक्षांनी तामिळनाडूतील लोकांना समजेल अशा भाषेत कधीही संवाद साधला नाही”, असे म्हणत अण्णामलाईनी भाषेचा मुद्दा अधोरेखित केला. भाषेच्या मुद्यावर काम करत असताना अंतर्गत व बाह्य अशा दोन्ही बाजूंनी आलेले अनेक अडथळे आणि विरोधाचा सामना केल्याचा उल्लेख अण्णामलाई यांनी केला आहे. तरी देखील त्यात बऱ्यापैकी यश आल्याचे अण्णामलाई म्हणाले. तमिळनाडूमध्ये अनेक वर्षांपासून सुरु असणाऱ्या राजकारणाला येथील जनता कंटाळली असल्याचेही अण्णामलाई यांनी राजीनामापत्रात म्हटले आहे.

“तामिळनाडूबाबत आमचे दृष्टिकोन जुळत नाहीत”, असा खुलासा अण्णामलाई यांनी राजीनाम्यात केला आहे. “पक्षश्रेष्ठींशी झालेल्या अनेक चर्चांची आणि गेल्या १८ महिन्यांत मी व्यक्त केलेल्या असहमतीची आठवण करून देऊ इच्छितो. तामिळनाडूमध्ये विकासाभिमुख आणि सांस्कृतिकदृष्ट्या रुजलेल्या राजकारणाच्या पुढील वाटचालीबाबतच्या माझ्या विचारांचा आणखी भार पक्षश्रेष्ठींवर टाकायचा नाही. वरिष्ठ नेतृत्वाशी झालेल्या संभाषणांनंतर, मी या निष्कर्षाप्रत पोहोचलो आहे की तामिळनाडूबाबत आमचे दृष्टिकोन जुळत नाहीत”, असे अण्णामलाई यांनी म्हटले आहे.

मला आता पक्षाबाहेर पडण्याची, राजकारणात प्रवेश करण्याच्या माझ्या मूळ उद्देशावर आत्मपरीक्षण करण्याची आणि भविष्यात वारे ज्या दिशेने नेतील त्या दिशेने प्रवास करण्याची वेळ आली आहे, असे अण्णामलाई यांनी राजीनाम्याच्या अखेरीस म्हटले आहे. खूप विचार केल्यानंतर हा निर्णय घेतल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### नवा प्रादेशिक पक्ष काढणार

अन्नामलाई आता तमिळनाडूमध्ये स्वतःचा नवीन राजकीय पक्ष स्थापन करण्याचा विचार करत आहेत. तमिळनाडूत सध्या राष्ट्रीय पक्षाला थेट मुख्य प्रवाहात येणे कठीण आहे, त्यामुळे सर्व घटकांना एकत्र घेऊन जाणारा प्रादेशिक पक्ष हाच सक्षम पर्याय ठरू शकतो, असा त्यांचा विश्वास आहे. भाजपमधून राजीनामा दिल्यानंतर के. अण्णामलाई म्हणाले, “आज आम्ही एक चळवळ सुरू करणार आहोत. आमचा राजकीय पक्ष तामिळनाडूतील पुढील विधानसभा निवडणूक लढवेल.”

# एव्हरेस्टवर मृत घोषित केलेला शेर्पा ६ दिवसांनंतर जिवंत परतला

**महाईन्यूज । काठमांडू**

**माउंट एव्हरेस्ट मोहिमेदरम्यान अनेकदा मृत्यूच्या दाढेतून गिर्यारोहक परत आल्याच्या कथा आपण ऐकतो, पण नेपाळमध्ये निसर्गाचा एक असा अद्भुत चमत्कार घडला आहे ज्यावर कोणाचाही विश्वास बसत नाहीये. एव्हरेस्टवर बेपत्ता झाल्यानंतर मृत घोषित करण्यात आलेला एक नेपाळी शेर्पा (मार्गदर्शक) तब्बल ६ दिवसांनंतर बर्फातून रांगत सुरक्षित परत आला आहे.**



### घरी अंत्यसंस्काराचे विधी सुरू, तितक्यात बातमी आली!


बेस कॅम्पवर प्रथमोपचार केल्यानंतर दावा शेर्पा यांना हेलिकॉप्टरने काठमांडूतील रुग्णालयात दाखल करण्यात आले. दुसरीकडे, त्यांच्या घरी अत्यंत भावूक वातावरण होते. दावा यांच्या निधनाची बातमी समजल्यामुळे त्यांची पत्नी दामू शेर्पा आणि मुलगी मेंडो ल्हामु शेर्पा यांनी घरात बौद्ध परंपरेनुसार अंत्यसंस्काराचे विधी सुरू केले होते. हा विधी अनेक दिवस चालतो आणि त्यातील दुसरा दिवस सुरू असतानाच त्यांना दावा जिवंत असल्याची बातमी मिळाली.

विशेष म्हणजे, तिकडे काठमांडूमध्ये त्याच्या घरी कुटुंबीयांनी त्याला मृत समजून अंत्यसंस्काराचे धार्मिक विधीही सुरू केले होते. अनेकांनी तर त्यांना सोशल मीडियावर श्रद्धांजली वाहणारे व्हिडिओही पोस्ट केले होते .'द गार्डियन'ने या थक्क करणाऱ्या घटनेचे वृत्त दिले आहे.

हिलरी दावा शेर्पा असे या मृत्यूला चकवा देणाऱ्या गिर्यारोहकाचे नाव आहे. २९ मे रोजी जगातील सर्वोच्च शिखर सर करून खाली उतरत असताना ७,५०० मीटर (२४,६०० फूट) उंचीवरील 'कॅम्प ३' च्या वर ते शेवटचे दिसले होते. मात्र, त्यानंतर त्यांचा इतर सहकाऱ्यांशी संपर्क तुटला आणि ते बेस कॅम्पवर पोहोचू शकले नाहीत, अशी माहिती बीबीसीच्या वृत्तात देण्यात आली होती.

हिलरी दावा शेर्पा ज्या भागात बेपत्ता झाले होते, तो एव्हरेस्टचा 'डेथ झोन' म्हणजेच मृत्यूचा सापळा मानला जातो. या अत्यंत उंचीवरील भागात हवेचा दाब कमालीचा कमी असतो आणि ऑक्सिजनची पातळी इतकी खालावलेली असते की माणसाला जिवंत राहणे अशक्य होते. त्यामुळेच, इतके दिवस या भागात अडकल्यानंतर दावा शेर्पा जिवंत असतील अशी आशा त्यांच्या सहकाऱ्यांनी आणि रेस्क्यू टीमने पूर्णपणे सोडली होती.

नेपाळच्या गिर्यारोहण क्षेत्रात या घटनेला थेट 'चमत्कार' म्हटले जात आहे. या शोध मोहिमेचे समन्वय पाहणारे '८के एक्स्पेडिशन्स'चे कार्यकारी संचालक पेम्बा शेर्पा यांनी सांगितले की, गुरुवारी सकाळी एका सपोर्ट टीमला हिलरी दावा शेर्पा खुंबू आइसफॉल जवळील बर्फाच्छादित उतारावरून बेस कॅम्पच्या दिशेने रांगत येताना दिसले. त्यांच्या हाताला फ्रॉस्टबाइट (अतिथंडीमुळे त्वचा आणि ऊती गोठणे) झाले होते, पण त्यांची प्रकृती समाधानकारक होती. त्यांना तातडीने सुरक्षित स्थळी हलवून अन्न आणि पाणी देण्यात आले.




## ‘काला हिरण’वरून सल्लू संतापला..


आगामी चित्रपट ‘काला हिरण’ संदर्भात सलमान खानने त्याच्या निर्मात्यांना कायदेशीर नोटीस पाठवली आहे. सलमानच्या वतीने पाठवलेल्या कायदेशीर नोटीसमध्ये निर्माता आणि दिग्दर्शकाला चित्रपटाची रिलीज थांबवण्याची, पोस्टर हटवण्याची आणि त्यासंबंधीचे सर्व प्रमोशनल मटेरियल काढून टाकण्याची मागणी करण्यात आली आहे. चिंकारा हरीण शिकार प्रकरणात सलमान सध्या जामिनावर बाहेर आहे. नोटीसमध्ये असेही म्हटले आहे की, जर या मागण्या मान्य केल्या नाहीत, तर चित्रपटाच्या टीमविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल. सलमानने पाठवलेल्या नोटीसमध्ये चित्रपटाच्या निर्मिती आणि प्रमोशनवर तत्काळ बंदी घालण्याची मागणी करण्यात आली आहे. नोटीसमध्ये म्हटले आहे की, हा चित्रपट कथितरित्या काळवीट शिकार प्रकरणावर आधारित आहे आणि यामुळे अभिनेत्याच्या प्रतिमेला हानी पोहोचू शकते. तसेच, यामुळे सुरू असलेल्या कायदेशीर प्रक्रियेवरही परिणाम होऊ शकतो. सलमानच्या कायदेशीर टीमचे म्हणणे आहे की, यासाठी अभिनेत्याची कोणतीही परवानगी घेण्यात आलेली नाही.

# उर्वशीचा संताप



बॉलिवूड अभिनेत्री उर्वशी रौतेलाने सोशल मीडियावर अभिनेत्रींमध्ये होणारी तुलना आणि फॅन वॉरवर नाराजी व्यक्त केली आहे. एका चाहत्याने एआयच्या मदतीने एक फोटो तयार केला होता, ज्यात उर्वशीसह ऐश्वर्या राय, प्रियांका चोप्रा, दीपिका पदुकोण आणि आलिया भट्ट यांच्या स्टारडमची तुलना केली होती. फोटोमध्ये महिला स्टार्सना खाली वाकलेले दाखवले आहे इंटरनेटवर एआय फोटो व्हायरल होत होता. या फोटोमध्ये ऐश्वर्या रायला जागतिक स्टारडमच्या शिखरावर दाखवले होते. तर प्रियंका चोप्रा एका सिंहासनावर बसली होती आणि तिच्याजवळ दीपिका पदुकोण व माधुरी दीक्षित उभ्या होत्या. फोटोमध्ये आलिया भट्ट, कतरिना कैफ, करीना कपूर आणि उर्वशी रौतेला यांना त्यांच्या खाली गुडघे टेकून बसलेले दाखवले होते. या फोटोमध्ये सर्व अभिनेत्रींची नावे देखील टॅग केली होती. अभिनेत्रींना अशाप्रकारे कमी लेखल्याबद्दल उर्वशीने कठोर भूमिका घेतली आहे. हा फोटो तिने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर शेअर केला आहे. यावर प्रतिक्रिया देताना उर्वशीने याला ‘टॉक्सिक’ म्हटले. “प्रत्येक अभिनेत्रीचा स्वतःचा प्रवास असतो. कठोर परिश्रम आणि नशीब असते. महिलांची एकमेकांशी तुलना केल्याने किंवा फॅन वॉर घडवून आणल्याने फक्त नकारात्मकता पसरते,” असे ती म्हणाली. याऐवजी आपण प्रतिभा, वाढ आणि दयाळूपणाचा आदर केला पाहिजे. कृपया अशा प्रकारची विषारी वृत्ती थांबवा, असे आवाहनदेखील उर्वशीने केले. चाहत्यांना अशा प्रकारच्या पोस्ट न बनवण्याचे आणि सर्व कलाकारांच्या कामाचे कौतुक करण्याची विनंती तिने केली आहे. उर्वशी सध्या कान्स फिल्म फेस्टिव्हल २०२६ मध्ये सहभागी होण्यासाठी फ्रान्समध्ये आहे, जिथे ती सलग पाचव्यांदा भारताचे प्रतिनिधित्व करत आहे. उर्वशी रौतेला कान्स फिल्म फेस्टिव्हल २०२६ मध्ये तिच्या लूकमुळे चर्चेत आहे. तिने यावेळी रेड कार्पेटवर योलांड ऑफिशियल लेबलचा ब्लॅक वेलवेट गाऊन परिधान केला होता, ज्यामध्ये व्ही-नेकलाइन होती. याशिवाय ती व्हिएतनामी डिझायनर लेबल जॉलीपोली कूटूरच्या लॅव्हेंडर शेडच्या गाऊनमध्येही दिसली. रेड कार्पेटवर मीडिया प्लॅटफॉर्म ब्रूटशी बोलताना उर्वशी भावूक झाली. ती म्हणाली, ‘जेव्हा मी माझ्या देशाचे प्रतिनिधित्व करते, तेव्हा मी फक्त उर्वशी राहत नाही, तर मी इंडिया बनते. हे माझे सलग पाचवे वर्ष आहे आणि मला याचा अभिमान आहे.’

# जान्हवी किल्लेकरचा ग्लॅमरस अंदाज



मराठी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री जान्हवी किल्लेकर सध्या तिच्या नव्या फोटोशूटमुळे चर्चेत आली आहे. ‘बिग बॉस मराठी’च्या पाचव्या पर्वानंतर जान्हवीची लोकप्रियता आणखी वाढली असून सोशल मीडियावर तिचा मोठा चाहतावर्ग तयार झाला आहे. आपल्या अभिनयासोबतच फॅशन आणि स्टाइलमुळेही ती नेहमीच चर्चेत असते. नुकतेच जान्हवीने तिच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवर काही आकर्षक फोटो शेअर केले आहेत. या फोटोंमध्ये ती काळ्या रंगाच्या स्टायलिश गाऊनमध्ये पाहायला मिळत आहे. तिच्या या नव्या लूकने चाहत्यांचे विशेष लक्ष वेधून घेतले आहे. फोटोशूटसाठी जान्हवीने काळ्या रंगाचा आधुनिक डिझाइनचा गाऊन परिधान केला आहे. साधा पण आकर्षक मेकअप, खुललेले केस आणि आत्मविश्वासपूर्ण हावभाव यामुळे तिचा संपूर्ण लूक अधिक उठून दिसत आहे. या गाऊनसोबत तिने मॅचिंग हाय हील्सची निवड केली असून त्यामुळे तिच्या व्यक्तिमत्त्वाला आणखी आकर्षक रूप मिळाले आहे. जान्हवीने हे फोटो शेअर करताना “कॉन्फिडन्स ही माझी सर्वात आवडती ॲक्सेसरी आहे” असे कॅप्शन दिले आहे. तिच्या या कॅप्शनचीही सोशल मीडियावर चर्चा होत आहे. आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व यांनाच खरे सौंदर्य मानणारा तिचा हा संदेश चाहत्यांना आवडला आहे. फोटो सोशल मीडियावर शेअर होताच चाहत्यांनी त्यावर भरभरून प्रतिक्रिया दिल्या आहेत. अनेकांनी तिच्या स्टाइलचे आणि व्यक्तिमत्त्वाचे कौतुक केले आहे. काहींनी तिच्या लूकला ‘एलिगंट’, ‘स्टायलिश’ आणि ‘ग्लॅमरस’ अशी विशेषणे दिली आहेत. कमेंट्स आणि लाइक्सच्या माध्यमातून चाहत्यांनी तिच्यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे. ‘बिग बॉस मराठी’मधील सहभागानंतर जान्हवी किल्लेकरला प्रेक्षकांकडून मोठी लोकप्रियता मिळाली. तिच्या स्पष्टवक्तेपणामुळे आणि खेळातील सहभागामुळे ती चर्चेत राहिली होती. त्यानंतरही ती सोशल मीडियावर सक्रिय राहून चाहत्यांशी संवाद साधत असते. सध्या तिच्या या नव्या फोटोशूटची सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरू आहे. तिच्या स्टायलिश आणि आत्मविश्वासपूर्ण लूकने पुन्हा एकदा चाहत्यांची मने जिंकली आहेत. त्यामुळे जान्हवीचे हे फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.

# भारत विरुद्ध पाकिस्तान 'महामुकाबला'!

## स्पर्धेचा थरार यंदा इंग्लंडच्या भूमीवर रंगणार असून १२ जूनपासून या स्पर्धेला सुरुवात

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**क्रिकेट जगतातील सर्वात कट्टर आणि पारंपरिक प्रतिस्पर्धी मानले जाणारे भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ पुन्हा एकदा क्रिकेटच्या मैदानावर आमनेसाने येण्यासाठी सज्ज झाले आहेत. या महामुकाबल्यासाठी आता अवघ्या काही दिवसांचाच कालावधी शिल्लक राहिला आहे. आयसीसी महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेत हे दोन्ही संघ आमनेसामने येणार असून या बहुप्रतिक्षित स्पर्धेची रणधुमाळी लवकरच सुरू होत आहे.**




दोन्ही संघांची तयारी अंतिम टप्प्यात आली असून सध्या मैदानी रणनीती आखण्यावर भर दिला जात आहे. प्रशिक्षक आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडू नेट्समध्ये कसून सराव करत असून प्रत्येक विभागात संतुलित कामगिरी करण्यावर भर दिला जात आहे. विश्वचषकासारख्या मोठ्या स्पर्धेत दमदार सुरुवात करण्यासाठी भारतीय संघ पूर्णपणे सज्ज असल्याचे चित्र सध्या दिसत आहे.

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेचा थरार यंदा इंग्लंडच्या भूमीवर रंगणार असून १२ जूनपासून या स्पर्धेला दिमाखात सुरुवात होईल. स्पर्धेच्या पहिल्या दिवशी यजमान इंग्लंड आणि श्रीलंका यांच्यात सलामीचा सामना खेळवला जाणार आहे. भारतीय महिला संघ आपल्या विश्वचषक मोहिमेची सुरुवात १४ जून रोजी पाकिस्तानविरुद्धच्या हाय-व्होल्टेज सामन्याने करेल.

विशेष म्हणजे या दिवशी रविवार असल्याने जगभरातील क्रिकेट चाहत्यांना या महामुकाबल्याचा आनंद घेता येईल. भारतीय वेळेनुसार हा सामना संध्याकाळी ७:०० वाजता सुरू होईल. १२ जून रोजी सुरू होणारी ही प्रतिष्ठेची स्पर्धा ५ जुलैपर्यंत चालणार आहे.

यंदाच्या विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाचा ज्या गटामध्ये समावेश करण्यात आला आहे, त्यात पाकिस्तानव्यतिरिक्त नेदरलँड्स, द. आफ्रिका, बांगलादेश आणि गतविजेत्या ऑस्ट्रेलिया या संघांचा समावेश आहे. भारतासाठी पाकिस्तानविरुद्धचे आव्हान तुलनेने सोपे मानले जात असले, तरी द. आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांच्याविरुद्ध भारतीय संघाला अत्यंत चुरशीच्या लढतीचा सामना करावा लागणार आहे.

महिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या इतिहासात पाकिस्तानच्या महिला संघाला अद्याप एकदाही भारतीय संघाचा पराभव करता आलेला नाही. हा भारताचा एक ऐतिहासिक आणि दबदबा निर्माण करणारा विक्रम असून, हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील टीम इंडिया हा धमाकेदार विजयी प्रवास पुढेही कायम ठेवण्यासाठी उत्सुक आहे. टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघ रचना हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना, शफाली वर्मा, जेमिमा रॉड्रिग्स, भारती फुलमाळी, दीप्ती शर्मा, रिचा घोष, श्री चरणी, यास्तिका भाटिया, नंदिनी शर्मा, अरुंधती रेड्डी, रेणुका सिंह, क्रांती गौड, श्रेयंका पाटील, राधा यादव अशा पद्धतीने असेल. यंदाच्या विश्वचषक स्पर्धेत युवा आणि अनुभवी खेळाडूंचा समतोल साधणारा भारतीय संघ मैदानात उतरणार आहे.

### लक्ष्य

भारतीय महिला क्रिकेट संघाला आतापर्यंत एकदाही महिला टी-२० विश्वचषकाचे जेतेपद पटकावता आलेले नाही. त्यामुळे कर्णधार हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली यंदा इंग्लंडमध्ये इतिहास रचण्याच्या इराद्यानेच भारतीय संघ मैदानात उतरेल. काही महिन्यांपूर्वीच भारतीय महिला संघाने एकदिवसीय (ODI) विश्वचषकाचे विजेतेपद पटकावून इतिहास घडवला होता, ज्यामुळे देशातील क्रीडाप्रेमींच्या आशा आणि अपेक्षा कमालीच्या उंचावल्या आहेत. दरम्यान, टी-२० विश्वचसक स्पर्धेपूर्वी भारत आणि इंग्लंड यांच्यात तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळवली गेली होती, ज्यामध्ये भारताला १-२ अशा फरकाने पराभवाचा सामना करावा लागला होता.

---

# २८ वर्षांपूर्वी 'दोन बाप' एकत्र खेळले वर्ल्डकप, आता 'मुलं' घालणार धुमाकूळ

**महाईन्यूज । पॅरिस**

**फुटबॉल हा केवळ ९० मिनिटांचा खेळ नाही, तर तो पिढ्यानपिढ्या रक्तामध्ये वाहणारा एक अद्भुत 'DNA' आहे... याचीच एक थरारक प्रचिती सध्या फुटबॉल जगताला आली आहे. तब्बल २८ वर्षांपूर्वी १९९८ च्या वर्ल्डकपमध्ये ज्या दोन रणधुरंदरांनी अर्जेंटिनाची शान वाढवण्यासाठी मैदानात रक्ताचं पाणी केलं होतं.**




काळ बदलला तरी फुटबॉलचा 'DNA' कसा बदलत नाही, याचंच जिवंत उदाहरण म्हणजे डिएगो सिमिओन यांचा सुपुत्र जियुलियानो सिमिओन (Giuliano Simeone) आणि पाब्लो पाझ यांचा मुलगा निको पाझ (Nico Paz)! २८ वर्षांपूर्वी ज्या दोन मित्रांनी अर्जेंटिनासाठी मैदान गाजवलं होतं, आज त्यांचीच मुलं राष्ट्रीय संघाच्या माध्यमातून एकत्र आली आहेत. ज्या प्रतिष्ठित निळ्या-पांढऱ्या जर्सीसाठी त्यांच्या वडिलांनी रक्ताचं पाणी केलं, नेमकी तीच जर्सी परिधान करून हे दोन शिलेदार २०२६ च्या फिफा विश्वचषकात उतरणार आहेत. जागतिक फुटबॉलच्या इतिहासात दोन सहकाऱ्यांची मुलं एकाच कालखंडात, एकाच आंतरराष्ट्रीय संघात खेळण्याची ही अत्यंत दुर्मिळ आणि ऐतिहासिक घटना ठरली आहे. नियतीचा हा अद्भुत खेळ समोर आल्यानंतर सोशल मीडियावर क्रीडाप्रेमींनी 'फुटबॉल खरोखरच खूप सुंदर आहे!' अशा शब्दांत आपल्या भावनांना वाट करून दिली आहे. चाहत्यांच्या मते, हा निव्वळ योगायोग नसून फुटबॉल देवतेने स्वतःच्या हाताने लिहिलेली एक देखणी पटकथा आहे. वडिलांचा तोच आक्रमकपणा, तीच चपळाई आणि देशावरील तीच निष्ठा घेऊन आता जियुलियानो आणि निको ही जोडगोळी अमेरिकेच्या भूमीवर काय कमाल करते, याकडे संपूर्ण क्रीडा जगताचे डोळे लागले आहेत. पिढ्या बदलल्या, चेहरे बदलले, पण अर्जेंटिनाच्या फुटबॉलचा रक्तारक्तात भिनलेला तोच जज्बा आजही तितकाच जिवंत आहे, हेच या घटनेने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

### २८ वर्षांपूर्वीचा 'तो' इतिहास

गोष्ट आहे १९९८ च्या फिफा विश्वचषकाची. अर्जेंटिनाच्या पट्टेरी निळ्या-पांढ-या जर्सीमध्ये डिएगो सिमिओन (Diego Simeone) आणि पाब्लो पाझ (Pablo Paz) हे दोन दिग्गज खेळाडू मैदानावर एकत्र उतरले होते. देशासाठी सर्वस्व पणाला लावणाऱ्या या जोडीने फुटबॉल जगतात आपला एक वेगळा ठसा उमटवला. त्या ऐतिहासिक क्षणांना आता २८ वर्षे उलटून गेली आहेत, पण काळ बदलला तरी इतिहास स्वतःची पुनरावृत्ती कशी करतो, याचं जिवंत उदाहरण आता समोर आलं आहे.

# ‘संडे ऑन सायकल’; वाहतुकीत बदल

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

भारतीय खेल प्राधिकरणाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘संडे ऑन सायकल’ उपक्रमानिमित्त रविवारी (७ जून) पिंपरी-चिंचवड शहरातील काही प्रमुख मार्गांवरील वाहतुकीत तात्पुरते बदल करण्यात आले आहेत. सायकल स्पर्धेमुळे सांगवी, वाकड आणि देहूरोड वाहतूक विभागाच्या हद्दीतील काही रस्ते वाहतुकीसाठी बंद राहणार असून वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विक्रांत देशमुख यांनी केले आहे.

राजीव गांधी ब्रिज ते जगताप डेअरी चौक, काळेवाडी फाटा, पुनावळे, औंध-रावेत बीआरटी मार्ग, मुकाई चौक आणि अंकुश चौक या मार्गांवर सायकल स्पर्धा होणार आहे. त्यामुळे ढोरे पाटील अंडरपासकडून डी-मार्टकडे जाणारा मार्ग बंद राहणार असून वाहतूक राजीव गांधी ब्रिजमार्गे ब्रेमेन चौकातून वळविण्यात येणार आहे. तसेच ब्रेमेन चौकातून ढोरे पाटील अंडरपासकडे जाणारा मार्गही बंद राहील.

शिवार चौकातून जगताप डेअरीमार्गे काळेवाडी चौकाकडे जाणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद राहणार असून ही वाहतूक जगताप डेअरी अंडरपासमार्गे सावित्रीबाई फुले उद्यानाच्या दिशेने वळविण्यात येईल. कस्पटे चौकातून जगताप डेअरीकडे जाणारी वाहने शिवार चौकमार्गे जाऊ शकतील.

काळाखडक परिसरातून डांगे चौकाकडे जाणारी वाहतूक डांगे चौक अंडरपासमार्गे थेरगाव फाटा येथून वळविण्यात येणार आहे. बिर्ला हॉस्पिटलकडून डांगे चौकाकडे जाणाऱ्या वाहनांनाही अंडरपासचा वापर करता येणार आहे. तसेच भक्ती-शक्ती चौकाकडून किवळे ब्रिजकडे जाणारी वाहतूक मुकाई चौकात बंद ठेवण्यात येणार असून संबंधित वाहनांना मस्के वस्ती चौकातून पर्यायी मार्गाने जावे लागणार आहे.

हे सर्व बदल रविवारी पहाटे ५.३० ते सकाळी १०.३० वाजेपर्यंत लागू राहणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी प्रवासाचे नियोजन करून पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे.

## पर्यायी मार्गांची व्यवस्था...

‘संडे ऑन सायकल’ उपक्रमामुळे रविवारी सकाळी ५.३० ते १०.३० या वेळेत काही प्रमुख मार्गांवरील वाहतूक बंद राहणार आहे. ढोरे पाटील अंडरपास, जगताप डेअरी, डांगे चौक, मुकाई चौक परिसरातील वाहनचालकांनी वाहतूक पोलिसांनी सुचविलेल्या पर्यायी मार्गांचा वापर करून प्रवासाचे नियोजन करावे.






PRIYADARSHANI
GROUP OF SCHOOLS


# BLOOD DONATION CAMP

## IN THE LOVING MEMORY OF
## LATE SMT. NAVAL INDRAMAN SINGH JI

## BE A HERO TODAY !

Join Our Blood Donation Drive


June 13, 2026
10:00 AM – 3:00 PM



Priyadarshani School Moshi.
Gat No: 195, Dehu Alandi
Road Boratewadi Moshi

### WHY YOU SHOULD DONATE BLOOD

One donation can save three lives. Stay healthy, spread kindness. Your blood makes a difference.




9890613333
pgosm05@gmail.com

# पिंपरी-चिंचवडसाठी लोकचळवळ उभारणार

## पिंपरी- चिंचवड महापालिकेच्या नव्या निममावलीला फेडरेशनचा तीव्र विरोध

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**औद्योगिक शहर म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवडचा चेहरामोहरा बदलताना आता हे शहर 'ग्रीन आणि सस्टेनेबल सिटी' करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल साधत, येणाऱ्या पिढीसाठी 'शुद्ध हवा आणि प्रदूषणमुक्त भविष्य' देण्यासाठी प्रत्येक नागरिकाने यात योगदान द्यावे. केवळ वृक्षारोपण न करता, त्या झाडांचे संवर्धन करत या मोहिमेला आता 'लोकचळवळ' बनवा," असे आवाहन चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी केले.**



जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून, पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या 'एक पेड माँ के नाम' आवाहनानुसार बारा घोलप महाविद्यालय परिसर आणि सांगवी जिल्हा रुग्णालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. त्यानिमित्त आमदार जगताप बोलत होते. यावेळी सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, माजी महापौर माई ढोरे, नगरसेवक नवनाथ जगताप, हर्षल ढोरे, ज्ञानेश्वर उर्फ माऊली जगताप, नगरसेविका पल्लवी जगताप, तृप्ती कांबळे, रवीना आंगोळकर, तसेच दुर्गाकौर आदियाल, महामंत्री मधुकर बच्चे, मंडल अध्यक्ष गणेश ढोरे यांच्यासह पक्षाचे विविध मंडल अध्यक्ष, बूथ प्रमुख, पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. या निमिताने वृक्षसंवर्धन, जतन आणि पर्यावरण रक्षणाची शपथ घेण्यात आली.

आमदार शंकर जगताप पुढे म्हणाले की, "झाड लावणे ही केवळ एक औपचारिकता नसून, ती भविष्यासाठी केलेली सामाजिक गुंतवणूक आहे. ही मोहीम आता शहरातील प्रत्येक गृहनिर्माण सोसायटी आणि घराघरापर्यंत पोहोचवण्याचा आमचा संकल्प आहे. नागरिकांनी दत्तक घेतलेले एक झाड, हीच या मोहिमेची खरी यशस्विता असेल." आधुनिक तंत्रज्ञान आणि निसर्ग यांचा मेळ घालत पिंपरी-चिंचवडला स्मार्ट आणि शाश्वत शहर म्हणून विकसित करण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.



"पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या संकल्पनेतील 'शाश्वत विकास' आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसजी यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी-चिंचवडचा चेहरामोहरा बदलण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. शहराचा औद्योगिक विकास साधताना पर्यावरणाचा समतोल राखणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड दत्तक घेऊन वृक्षारोपण मोहिमेचे एका मोठ्या लोकचळवळीत रूपांतर करावे. केंद्र आणि राज्य सरकारच्या धोरणांना गती देत, निसर्गाच्या सोबतीने पिंपरी-चिंचवडला एक 'ग्रीन आणि सस्टेनेबल सिटी' बनवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."

- शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा मतदारसंघ.

### देशी वृक्षांच्या लागवडीवर जास्त भर द्या

आज वृक्षारोपण मोहिमेत शोभेच्या झाडांऐवजी बकुळ, कडुलिंब, कदंब, ताम्हण, बहावा आणि महोगणी अशा बहुउद्देशीय आणि औषधी गुणधर्म असलेल्या देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. हे वृक्ष केवळ सावली देणारे नसून, स्थानिक पक्षी आणि कीटकांच्या जैवविविधतेसाठी पोषक आहेत. तसेच, महाराष्ट्राचे राज्यपुष्प असलेल्या 'ताम्हण'ची लागवड करून सांस्कृतिक वारशाचेही जतन करण्यात आले.

# प्रा. अवधुत कुलकर्णी यांना स्थापत्य अभियांत्रिकीमध्ये पीएच.डी. पदवी

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**आकुर्डी येथील डॉ. डी. वाय. पाटील शैक्षणिक संकुल अंतर्गत कार्यरत डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय येथील स्थापत्य अभियांत्रिकी विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले प्रा. अवधुत कुलकर्णी यांना स्थापत्य अभियांत्रिकी या शाखेमध्ये पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. ही पदवी संदीप विद्यापीठ, नाशिक तर्फे देण्यात आली.**



प्रा. कुलकर्णी यांच्या संशोधनाचे शीर्षक "शहरी रस्त्यांवरील इलेक्ट्रिक बसच्या रिअल-टाइम ड्रायव्हिंग सायकलच्या परिणामाचे विश्लेषण" (Impact Analysis of Real-time Driving Cycle of Electric Bus on Urban Roads) असे आहे. वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत इलेक्ट्रिक बसचा वापर वाढत असून, त्याचा शहरी रस्त्यांवरील वाहतूक, ऊर्जा कार्यक्षमता व पर्यावरणीय परिणाम यांचा सखोल अभ्यास या संशोधनात करण्यात आला आहे. हे संशोधन भविष्यातील शाश्वत आणि पर्यावरणपूरक वाहतूक नियोजनासाठी मार्गदर्शक ठरणार आहे.

या संशोधन कार्यासाठी त्यांना कुलगुरु प्रा. डॉ. अरुण कुमार द्विवेदी तसेच नगर नियोजक डॉ. तुषार बागुल यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. पीएच.डी. पदवी प्राप्त केल्याबद्दल डॉ. डी वाय पाटील शैक्षणिक संकुलात त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संकुलाचे चेअरमन सतेज पाटील, संस्थेचे विश्वस्त तेजस पाटील, संकुलाचे संचालक रियर ॲडमिरल अमित विक्रम (निवृत्त), महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पी. मालती, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. अशोक मोरे, महाविद्यालयाचे कुलसचिव प्रशांत भालेराव तसेच सर्व प्राध्यापक व सहकारी वर्ग उपस्थित होते.

सर्व मान्यवरांनी प्रा. अवधुत कुलकर्णी यांच्या शैक्षणिक यशाबद्दल त्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्रा. कुलकर्णी यांच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत भर पडली असून, संशोधन क्षेत्रात संस्थेची प्रतिमा अधिक बळकट झाली आहे.



"पीएच.डी. शिक्षणाच्या माध्यमातून येत्या काळात शहरी वाहतूक आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात माझे संशोधन धोरणकर्ते, स्थानिक स्वराज्य संस्था आणि अभियंते यांना उपयुक्त ठरावा, असा माझा प्रामाणिक प्रयत्न राहील. भविष्यातील पिढीसाठी सुरक्षित, शाश्वत आणि स्मार्ट शहरे घडवण्यासाठी शिक्षण, संशोधन आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यांची सांगड घालणे हेच माझे ध्येय आहे."

– प्रा. अवधूत कुलकर्णी, डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, आकुर्डी.

# मोदी सरकारच्या १२ वर्षपूर्तीनिमित्त वृक्षारोपण अभियान

## पर्यावरण संवर्धनाचा संदेश; आमदार महेश लांडगे यांचे शहरवासियांना आवाहन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या १२ वर्षांच्या यशस्वी वाटचालीनिमित्त आणि जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पिंपरी-चिंचवड शहरात विविध ठिकाणी वृक्षारोपण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात आला. या निमित्ताने पिंपरी-चिंचवडमध्ये पर्यावरण दिनी वसुंधरा संवर्धनाचा संदेश दिला आहे.**



भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्त्वाखाली "मोदी सरकारची १२ वर्षे – विश्वास, विकास व जनकल्याण" या अभियानांतर्गत शहरातील विविध मंडलांमध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले. इंद्रायणीनगर-नेहरूनगर मंडल, मोशी-चऱ्होली मंडल, दिघी-गवळीनगर-गव्हाणेवस्ती मंडल तसेच चिखली-कृष्णानगर मंडल येथे कार्यकर्त्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. यावेळी महापौर रवि लांडगे, माजी महापौर नितीन काळजे, सरचिटणीस विकास डोळस, मंडलाध्यक्ष प्रमोद परदेशी, शिवराज लांडगे, अजय साने, अजित बुर्डे, नगरसेवक व आजी-माजी पदाधिकारी उपस्थित होते.

या उपक्रमादरम्यान पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत प्रत्येक बूथ स्तरावर वृक्षलागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी कार्यकर्त्यांना आवाहन करण्यात आले. यावेळी स्थानिक पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भाजपाचे वरिष्ठ उपाध्यक्ष संजय पटनी म्हणाले की, माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी "राष्ट्र प्रथम" या संकल्पनेसोबत सातत्याने सेवा देत आहेत. त्यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली महायुती सरकारच्या ऐतिहासिक कामगिरीची १२ वर्षे दि. ७ जून २०२६ रोजी पूर्ण होत आहेत. मोदीजींच्या नेतृत्वाखालील सरकार देशातील गरीब, शोषित आणि वंचित घटकांच्या कल्याणासाठी उल्लेखनीय कार्य करीत आहेत. तसेच "विकसित भारत" या संकल्पनेच्या पूर्ततेसाठी वेगाने पुढे जात आहेत. आपले राष्ट्रीय अध्यक्ष मा. नितीन नबीन जी यांच्या नेतृत्वात तसेच मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस, यांच्या मार्गदर्शनात महाराष्ट्रात "मोदी सरकारची १२ वर्षे विश्वास, विकास, जनकल्याण" अभियानातर्गत ५ जून, २०२६ ते २१ जून २०२६ या काळात विविध कार्यक्रमांची योजना ठरली आहे.

"पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज असून वृक्षारोपणाच्या माध्यमातून भावी पिढ्यांसाठी हरित वारसा निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या संकल्पनेला साकार करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाचा सहभाग महत्त्वाचा आहे." भाजपाच्या "विश्वास, विकास व जनकल्याण" अभियानांतर्गत आगामी काळात विशेष जनसंपर्क अभियान, जनकल्याण शिबिरे, नैसर्गिक शेती कार्यशाळा तसेच जागतिक योग दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.



"पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने गेल्या १२ वर्षांत विकास, सुशासन आणि जनकल्याणाचा नवा अध्याय अनुभवला आहे. 'विकसित भारत' या संकल्पनेच्या पूर्ततेसाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग महत्त्वाचा आहे. पर्यावरण संवर्धन, जनसंपर्क, जनकल्याणकारी योजनांचा लाभ आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम घडविणारे हे अभियान समाजाला सकारात्मक दिशा देणारे ठरेल. पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांच्या सहकार्याने आपण अधिक हरित, समृद्ध आणि सक्षम शहर उभारण्याचा संकल्प केला आहे."

**- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**


---

# रहाटणी, गंगानगर परिसरातील अनधिकृत बांधकामावर महापालिकेचा 'बुलडोझर'

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'ग' क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. २७, मौजे रहाटणी येथील गंगानगर, रहाटणी गावठाण परिसरातील अनधिकृत बांधकामांवर आज निष्कासनाची कारवाई करण्यात आली. या कारवाई दरम्यान एकूण ३ ठिकाणी असलेली अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली आहे.**





ही कारवाई आयुक्त विजय सूर्यवंशी यांच्या आदेशान्वये, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच 'ग' क्षेत्रीय अधिकारी मुकेश कोळप यांच्या अधिपत्याखाली पार पाडण्यात आली.

कारवाईमध्ये उपअभियंता सुनील बेळगावकर, जयवंत रोकडे, प्रताप मोरे तसेच महापालिकेच्या धडक कारवाई पथकातील (अ, ब, ड व ग) एकूण १५ बीट निरीक्षक, ४० एम.एस.एफ. जवान, ०१ पोलीस उपनिरीक्षक, ०५ पोलीस कर्मचारी आणि १ जेसीबी मशीन यांच्या साहाय्याने ही मोहीम राबविण्यात आली. यासोबतच विद्युत विभाग व इतर संबंधित विभागांचे सहकार्य घेऊन ही कारवाई यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली.

शहरातील अनधिकृत बांधकामांवर यापुढेही नियमानुसार सातत्याने निष्कासन कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

---

# खंडोबा देवस्थान ट्रस्ट आणि पीसीईटीच्या वतीने गुणवंतांचा सत्कार

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

आकुर्डी येथील खंडोबा देवस्थान ट्रस्ट आणि पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीइटी) यांच्या वतीने इयत्ता १० वी व १२ वी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यावेळी डॉ. शितल कुमार रवंदळे हे १० वी, १२ वी नंतरचे करिअर याविषयी मार्गदर्शन करणार आहेत. रविवारी (दि. ७ जून) रोजी सायंकाळी ५ वाजता, आकुर्डी, श्री खंडोबा सांस्कृतिक भवन येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष शंकरराव पांढरकर आणि पीसीईटीचे सचिव विठ्ठल काळभोर यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

यावेळी उपाध्यक्ष विधानसभा अण्णा बनसोडे, आमदार शंकर जगताप, महेश लांडगे, उमा खापरे, अमित गोरखे, पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, खजिनदार शांताराम गराडे, खंडोबा देवस्थान ट्रस्ट खजिनदार गोविंद काळभोर, माजी उपमहापौर पिंपरी दिनकरराव दातीर पाटील, कला क्रीडा विभाग सभापती कैलास कुटे, नगरसेवक प्रमोद कुटे, वैशाली काळभोर, अरुणा लंगोटे, कामगार नेते राजन नायर आणि खंडोबा देवस्थान ट्रस्ट सदस्य आदी उपस्थित राहणार आहेत. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. या विद्यार्थ्यांनी आपली गुणपत्रिका झेरॉक्स प्रत श्री खंडोबा देवस्थान ट्रस्ट कार्यालयात दि. ५ जून, सकाळी १० ते दुपारी १ किंवा सायंकाळी ५ ते ८ वाजेपर्यंत जमा करावी असे आवाहन खंडोबा देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

# सोसायटीधारकांना सहकार्य करा, त्रास देऊ नका..!

## ओला कचरा संदर्भात पिंपरी-चिंचवड-चाकण हाऊसिंग सोसायटी संघटनेचा तीव्र आंदोलनाचा इशारा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**


**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने १ जुलै २०२६ पासून मोठ्या गृहनिर्माण सोसायट्यांकडून ओल्या कचऱ्याचे संकलन बंद करून, सोसायट्यांमध्येच कंपोस्टिंग अथवा बायो-मिथेनेशन प्रकल्प उभारणे बंधनकारक करण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत अव्यवहार्य, अन्यायकारक आणि नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार टाकणारा असल्याचा आरोप पिंपरी-चिंचवड-चाकण हाऊसिंग सोसायटी संघटनेने केला आहे.**

संघटनेच्या वतीने या निर्णयाचा तीव्र निषेध करण्यात आला असून, पालिका प्रशासनाने तात्काळ या निर्णयाचा पुनर्विचार करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

प्रशासनाने या निर्णयाचा तात्काळ पुनर्विचार न केल्यास, शहरातील विविध हाऊसिंग सोसायट्यांना एकत्र करून लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही संघटनेने दिला आहे. "हाऊसिंग सोसायट्यांना सहकार्य करा, त्रास देऊ नका!" अशी ठाम भूमिका संघटनेने स्पष्ट केली आहे.

### जागेचा अभाव आर्थिक बोजा

शहरातील बहुतांश गृहनिर्माण सोसायट्यांकडे कंपोस्टिंग किंवा बायो-मिथेनेशन प्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध नाही. तसेच या प्रकल्पांची उभारणी, देखभाल आणि तांत्रिक व्यवस्थापनासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च येतो.



PIMPRI-CHINCHWAD CHAKAN
HOUSING SOCIETY SANGATHAN

"माननीय आयुक्तांनी एकदा हाऊसिंग सोसायट्यांमध्ये राहणाऱ्या सामान्य नागरिकांच्या अडचणी समजून घ्याव्यात. अनेक सोसायट्यांकडे जागेची कमतरता आहे, तर काहींकडे आवश्यक आर्थिक आणि तांत्रिक साधनसामग्री नाही. अशा परिस्थितीत नियमांची सक्ती करणे योग्य नाही. दंडात्मक भूमिका न घेता प्रशासनाने संवाद साधून व्यवहार्य उपाययोजना कराव्यात. हाऊसिंग सोसायट्यांना सहकार्य करा, त्रास देऊ नका."

**- राहुल राजपूत, सेक्रेटरी, रिव्हर रेसिडेन्सी मोशी.**

"पीसीएमसीने घेतलेला हा निर्णय नागरिकांवर अन्याय करणारा आहे. अनेक सोसायट्यांकडे आवश्यक जागा आणि सुविधा नाहीत. पर्यावरण रक्षणाला आमचा विरोध नाही, मात्र जबरदस्ती, दंड आणि गुन्हे दाखल करण्याची भाषा आम्हाला मान्य नाही. प्रशासनाने तात्काळ पुनर्विचार करून व्यावहारिक पर्याय उपलब्ध करून द्यावेत, अन्यथा संघटना नागरिकांच्या हक्कांसाठी तीव्र लढा उभारेल."

**- सत्यव्रत त्रिपाठी, अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड-चाकण हाऊसिंग सोसायटी संघटना.**

### संघटनेच्या प्रमुख मागण्या

- हाऊसिंग सोसायट्यांवरील दंडात्मक कारवाई तात्काळ स्थगित करावी.
- नव्या नियमांच्या अंमलबजावणीला मुदतवाढ द्यावी.
- सोसायटी प्रतिनिधी व पालिका प्रशासन यांची संयुक्त समिती स्थापन करावी.
- कंपोस्टिंग प्रकल्पांसाठी आर्थिक अनुदान व तांत्रिक सहाय्य द्यावे.
- जागेअभावी अडचणीत असलेल्या सोसायट्यांसाठी पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून द्यावी.
- गुन्हे दाखल करण्याच्या तरतुदी तात्काळ मागे घ्याव्यात.

### नागरिकांना सक्ती नको

पर्यावरण संवर्धन आणि प्रभावी कचरा व्यवस्थापनाला आमचा विरोध नाही, मात्र नागरिकांच्या अडचणी लक्षात न घेता नियमांची सक्ती करणे आणि दंडात्मक कारवाई तसेच गुन्हे दाखल करण्याची भाषा वापरणे चुकीचे असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. प्रशासनाने हाऊसिंग सोसायट्यांशी थेट संवाद साधून, व्यवहार्य आणि सर्वसमावेशक पर्याय शोधावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

# भाजयुमो अध्यक्ष अनिरुद्ध काळोखे पाटील यांची सामाजिक बांधिलकी!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा, श्री क्षेत्र देहू-देहूरोड शहर (मंडल) तसेच श्री छत्रपती शिवाजी महाराज माथाडी कामगार संघटनेचे अध्यक्ष पै. अनिरुद्ध श्रीकांत काळोखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आणि अधिक मासाच्या पवित्र औचित्याने विविध सामाजिक व धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांद्वारे समाजसेवा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात येणार आहे.**




भाजयुमो देहू-देहूरोड मंडलच्या वतीने देण्यात आलेल्या माहितीनुसार, वाढदिवसाचे औचित्य साधून कोणताही दिखाऊपणा न करता समाजोपयोगी कार्यांना प्राधान्य देण्यात आले आहे. दिवसभर विविध ठिकाणी सेवा, दान आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून कार्यकर्ते व नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग अपेक्षित आहे. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८ वाजता गेथसेमाने आश्रम येथे वृद्धाश्रम भेट आणि ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधून होणार आहे. त्यानंतर सकाळी ८.४५ वाजता येलवाडी येथील बालकाश्रमात भेट देऊन बालकांना खाऊ व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. सकाळी १० वाजता श्री क्षेत्र देहू येथील श्री संत तुकाराम महाराज मंदिरात महाआरती व दर्शनाचा कार्यक्रम होईल. दुपारी १.३० वाजता गोशाळेला भेट देऊन गोमाता पूजन व चारा दान करण्यात येणार असून रात्री ८.३० वाजता देहू येथील इस्कॉन मंदिरात भव्य अन्नदान उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

दरम्यान, वाढदिवस आणि अधिक मासाच्या पवित्र मुहूर्तावर पै. अनिरुद्ध काळोखे पाटील हे दुपारी ३.३० नंतर नागरिक, कार्यकर्ते व हितचिंतकांच्या भेटी स्वीकारणार आहेत. या सर्व सामाजिक व धार्मिक उपक्रमांना नागरिकांनी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन भाजयुमो देहू-देहूरोड मंडलच्या वतीने करण्यात आले आहे.

वाढदिवस हा केवळ शुभेच्छा स्वीकारण्याचा दिवस नसून समाजाप्रती आपली जबाबदारी अधिक दृढ करण्याची संधी असते. अधिक मासाच्या पवित्र काळात वृद्ध, निराधार बालके आणि गोसेवा यांसारख्या उपक्रमांद्वारे समाजसेवेचा छोटासा प्रयत्न करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

**- पै. अनिरुद्ध काळोखे पाटील, अध्यक्ष, भाजपा युवा मोर्चा.**

